सामान्य प्रशासन विभाग, जिल्हा परिषद धाराशिव
Email-dyceogaddharashiv1@gmail.com
Phone No - 02472 / 223388

दिनांकः-०२/०३/२०२४

जा.क्र/जिपधा/साप्रवि/ने-२/कावी/ ४७६ /२०२४

प्रति,

-------------------------------------
-------------------------------------
-------------------------------------

**विषयः जिल्हा परिषद धाराशिव अंतर्गत सरळसेवा पदभरती प्रक्रीया-२०२३ कागदपत्र पडताळणीसाठी दिनांक ०७/०३/२०२४ रोजी सकाळी ११.०० वाजता उपस्थित राहणेबाबत..**

संदर्भ : १) जिल्हा परिषद धाराशिव यांचेकडील सरळसेवा पदभरती सन २०२३साठी जाहिरात क्रमांक-१/२०२३, दिनांक ५/८/२०२३

२) कनिष्ठ सहाय्यक (लिपीकवर्गीय) या पदासाठी IBPS मुंबई यांचेकडील online परिक्षेतील प्राप्त निकाल

उपरोक्त विषयी जिल्हा परिषद धाराशिव अंतर्गत गट-क संवर्गातील सरळसेवा पदभरती-२०२३ साठी जाहिरात क्रमांक-१/२०२३, दिनांक ५/८/२०२३ च्या अनुषंगाने IBPS कंपनीमार्फत घेण्यात आलेल्या कनिष्ठ सहाय्यक (लिपीकवर्गीय) या पदाच्या online परिक्षेमधील प्राप्त निकालानुसार पात्र गुणवत्ताधारक उमेदवारांची यादी या जिल्हा परिषदेच्या www.zposmanabad.gov.in व जिल्हाधिकारी कार्यालय धाराशिव येथील www.osmanabad.gov.in या संकेतस्थळावर दिनांक २६/०२/२०२४ रोजी प्रसिध्द करण्यात आलेली आहे.

कनिष्ठ सहाय्यक (लिपीकवर्गीय) पदासाठी जाहिरातीमध्ये नमुद प्रवर्गातील रिक्त पदे प्रसिध्द करण्यात येऊन जाहिरातीमधील नमुद प्रवर्गातील रिक्त पदे भरणेसाठी प्रवर्गनिहाय कागदपत्र पडताळणीसाठी पात्र ठरलेल्या उमेदवारांची यादी जिल्हा परिषदेच्या www.zposmanabad.gov.in व जिल्हाधिकारी कार्यालय धाराशिव येथील www.osmanabad.gov.in या संकेतस्थळावर दिनांक १/०३/२०२४ रोजी प्रसिध्द करण्यात आलेली आहे.

कनिष्ठ सहाय्यक (लिपीकवर्गीय) संवर्गातील भरावयाच्या प्रवर्गनिहाय रिक्त पदासाठी कागदपत्र पडताळणीसाठी पात्र ठरलेल्या उमेदवारांच्या मुळ शैक्षणिक व इतर आवश्यक सर्व अभिलेखे तसेच जाहिरातीमधील नमूद आवश्यक कागदपत्राची पडताळणी दिनांक ०७/०३/२०२४ रोजी सकाळी ११.०० वाजता कै.यशवंतराव चव्हाण, जिल्हा परिषद सभागृह धाराशिव येथे करण्यात येणार आहे.

सबब याव्दारे आपणास कळविण्यात येते की, आपले मुळ शैक्षणिक व इतर आवश्यक अभिलेखे तसेच जाहिरातीमधील नमूद आवश्यक कागदपत्रासह पडताळणीसाठी आपण दिनांक ०७/०३/२०२४ रोजी वेळेवर उपस्थित राहावे. कागदपत्र पडताळणीसाठी ठरवून दिलेल्या दिनांकास गैरहजर राहणा-या उमेदवारांचा कागदपत्र पडताळणीसाठी नंतर विचार केला जाणार नाही. सदर उमेदवारास निवड प्रक्रियेसंबंधात कोणताही दावा करता येणार नाही किंवा हक्क सांगता येणार नाही, याची नोद घ्यावी.

(सुर्यकांत भुजबळ)
**उपमुख्य कार्यकारी अधिकारी (सा.प्र)**
**तथा सदस्य सचिव जिल्हा निवड समिती**
जिल्हा परिषद धाराशिव

**प्रत माहितीस्तव सविनय सादर.**

१) मा.जिल्हाधिकारी धाराशिव तथा अध्यक्ष जिल्हा निवड समिती धाराशिव
२) मा.मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद धाराशिव

स्वा/-
**(सुर्यकांत भुजबळ)**
**उपमुख्य कार्यकारी अधिकारी (सा.प्र)**
**तथा सदस्य सचिव जिल्हा निवड समिती**
जिल्हा परिषद धाराशिव

Scanned with OKEN Scanner

**जिल्हा परिषद धाराशिव सरळसेवा पदभरती-२०२३**

**या कार्यालयाने प्रसिध्द करण्यात आलेल्या कनिष्ठ सहाय्यक (लिपीकवर्गीय) या पदासाठी**

उमेदवारांनी कागदपत्रे पडताळणीस घेऊन यावयाचे कागदपत्रांची यादी

| अ.क्र | कागदपत्रे/प्रमाणपत्र |
|---|---|
| १. | संकेतस्थळावर ऑनलाईन पध्दतीने भरलेल्या मूळ अर्जाची प्रिंट आऊट तसेच परीक्षा फी जमा केल्याचा पुरावा |
| २. | अर्जदाराची माहिती बरोबर असल्याचे स्वयंघोषणापत्र |
| ३. | शैक्षणिक अर्हतेचा पुरावा |
| ४. | वयाचा पुरावा |
| ५. | जन्माचा पुरावा |
| ६. | आर्थिकदृष्टया दुर्बल घटकातील असल्याचा पुरावा |
| ७. | राखीव प्रवर्गातुन निवड झालेल्या उमेदवारांचे संबंधित प्रवर्गाचे जात प्रमाणपत्र,जातपडताळणी प्रमाणपत्र |
| ८. | नॉन क्रिमीलेअर प्रमाणपत्र (अर्ज सादर करण्याच्या दिनांकास वैध असणारे) |
| ९. | पात्र दिव्यांग व्यक्ती असल्याचा पुरावा |
| १०. | पात्र माजी सैनिक असल्याचा पुरावा |
| ११. | खेळाडुसाठीच्या आरक्षणाकरीता पात्र असल्याचा पुरावा |
| १२. | अनाथ आरक्षणकरीता पात्र असल्याचा पुरावा |
| १३. | महाराष्ट्र राज्याचा अधिवास प्रमाणपत्र |
| १४. | महाराष्ट्र कर्नाटक सिमा भागातील महाराष्ट्र शासनाने दावा सांगितलेल्या ८६५ गावांमधील मराठी भाषीक उमेदवारांना सक्षम प्राधिका-याचा विहित नमुन्यातील दाखला |
| १५. | विवाहित स्त्रियांच्या नावात बदल झाल्याचा पुरावा |
| १६. | मराठी भाषेचे ज्ञान असल्याचा पुरावा |
| १७. | लहान कंटुंबाचे प्रतिज्ञापत्र |
| १८. | पदवीधर/पदविकाधारक अंशकालीन असल्याबाबतचे प्रमाणपत्र |
| १९. | **MS-CIT** अथवा समकक्ष प्रमाणपत्र |
| २०. | टंकलेखन प्रमाणपत्र |
| २१. | लघुलेखन प्रमाणपत्र |
| २२. | अनुभव प्रमाणपत्र |
| २३. | नावातील बदलाबाबत प्रमाणपत्र/शासन राजपत्र (लागू असल्यास) त्याबाबतचा पुरावा |
| २४. | छायाचित्र ओळख पुरावा (आधारकार्ड, वाहन परवाना, पॅनकार्ड,राज्य निवडणुक आयोगाचे निवडणूक ओळखपत्र, पारपत्र, राष्ट्रीयकृत बॅकेचे खातेपुस्तक) |

**(सुर्यकांत भुजबळ)**

**उपमुख्य कार्यकारी अधिकारी (सा.प्र)**

**तथा सदस्य सचिव जिल्हा निवड समिती**

जिल्हा परिषद धाराशिव

Scanned with OKEN Scanner